-: प्रेस नोट :-                    दिनांक ०२.१०.२०१९

## -: स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणची कामगिरी :-

## मोक्काच्या २ गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी रवी बाशा पवार यास पकडले

---

विधानसभा निवडणुक सन २०१९ च्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या अभिलेखा वरील फरारी व पाहिजे असलेल्या आरोपी यांच्या शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखे कडील अधिकारी व कर्मचारी हे दिनांक ३०.०८.२०१९ रोजी मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरूण सावंत यांचे नेतृत्वाखाली करकंब पोलीस ठाणेच्या हद्दीत भोसे गावाचे ठिकाणी ता.पंढरपूर पेट्रोलिंग करीत आले असताना त्यांना त्याचे गोपनिय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, करमाळा पोलीस ठाणे गुरनं ५९/२०१८ भादंवि कलम ३९२,३४ व करमाळा पोलीस ठाणे गुरनं २३२/२०१९ भादंवि कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल असलेल्या दोन्ही गुन्हयास लावण्यात आलेल्या मोक्काच्या गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी रवी बाशा पवार (रा.शेलगाव ता.करमाळा ) हा भोसे ता.पंढरपूर येथील चौकात येणार असल्याची बातमी मिळाली होती.

मिळालेल्या बातमी प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखे कडील अधिकारी व कर्मचारी असे भोसे गावचे चौकात सापळा लावुन थांबले असता तेथे एक संशयित इसम चौकातुन चालत येताना स्थागुशा कडील पथकास दिसला. त्या इसमाचा स्थागुशा कडील अधिकारी व कर्मचारी यांना संशय आल्याने त्या सर्वांनी त्यास गराडा घालुन शिताफीने पकडले. त्यास त्याचे नाव, गाव, पत्ता विचारता त्यांनी त्याचे नाव रवी बाशा पवार (वय ३० रा.शेलगाव ता.करमाळा ) असे सांगितले.

सदरचा आरोपी हा करमाळा पोलीस ठाणेस कडील मोक्काच्या २ गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी होता. त्यास पुढील कार्यवाही करीता उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा, उपविभाग करमाळा याचे ताब्यात दिले आहे.

सदरचा आरोपी सन २०१८ पासुन मोक्का गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी आहे. सदर आरोपी विरूध्द सोलापूर ग्रामीण जिल्हयातील माढा,करमाळा, कुर्डुवाडी या पोलीस ठाणेस माला विषयक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. अतुल झेंडे याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरूण सावंत यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री.सत्यजीत आवटे, पोहवा/ विजयकुमार भरले, पोना/रवि माने, लालसिंग राठोड, परशुराम शिंदे, पोकॉ/सचिन गायकवाड, रवि हाटखिळे व चापोकॉ/रामनाथ बोबिलवार व दिपक जाधव यांनी बजावली आहे.

-- 00 --

Scanned by CamScanner